मुंबई विद्यापीठ
University of Mumbai
Re-Accredited A++ Grade (CGPA 3.65) by NAAC
Category I University by UGC
Estd. 1971
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)
(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था)
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION (CDOE)
(FORMERLY INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING (IDOL))
Dr. Shankar Dayal Sharma Bhavan, Vidyanagari, Santacruz (E.), Mumbai - 400 098.
Website : mu.ac.in/distance-open-learning
Email : info@idol.mu.ac.in

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठात विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी, शिष्यवृत्ती बाबत माहिती व सूचना :-

*** शिष्यवृत्ती योजनां बाबत सविस्तर माहितीसाठी शासनाचे mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळ पहावे. संबंधित शिष्यवृत्ती योजनां बाबतचे शासन निर्णय महाडीबीटी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, अधिक माहितीसाठी शासन निर्णयाचेही वाचन करावे.**

* दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे ५ शिष्यवृत्ती योजना मंजूर आहेत.

| क्रमांक | जात प्रवर्ग | प्रवर्गाचा शासन विभाग | प्रवर्गनिहाय विभागवार शिष्यवृत्ती योजनेचे नाव |
|---|---|---|---|
| No. | Caste Category | Category wise Govt. Department | Category wise Name of Scholarship Scheme |
| १) | अनुसूचित जाती करिता | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची | **भारत सरकार पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना** |
| | Schedule Caste | Social Justice and Special Assistance | **Govt. of India Post-Matric Scholarship** |
| २) | अनुसूचित जमाती करिता | आदिवासी विकास विभागाची | **भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती** |
| | Scheduled Tribes | Tribal Development Department | **Post-Matric Scholarship Scheme (Govt. of India)** |
| ३) | इतर मागासवर्ग करिता | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालयाची | **विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती** |
| | Other Backward Class | VJNT, OBC and SBC Welfare Department | **Post Matric Scholarship to VJNT** (Vimukta Jati, Nomadic Tribes) |
| ४) | इतर मागासवर्ग करिता | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालयाची | **इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती** |
| | Other Backward Class | VJNT, OBC and SBC Welfare Department | **Post Matric Scholarship to OBC** (Other Backward Classes) |
| ५) | इतर मागासवर्ग करिता | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालयाची | **वि.मा. प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती** |
| | Other Backward Class | VJNT, OBC and SBC Welfare Department | **Post Matric Scholarship to SBC** (Special Backward Classes) |

.....२/-

* **या शिष्यवृत्ती बाबींची अधिक माहिती पुढे दिली आहे.**

* शिष्यवृत्ती योजनेचा लाभ फक्त महाराष्ट्र राज्य अधिवास/ रहिवासी प्रमाणपत्र धारक विद्यार्थ्यांकरिताच आहे.

* ***उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजने व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज केल्यास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.***

* **महाडीबीटी संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या सर्वच शिष्यवृत्ती योजना दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमास लागू नाहीत,** त्यामुळे अन्य शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरु नयेत.

* **V.J. N.T. / O.B.C. / S.B.C.** प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या शिष्यवृत्ती साठी पात्र असल्यास (*१.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणारे उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य अधिवास/ रहिवासी प्रमाणपत्र बारकोड असणारे, जात प्रमाणपत्र बारकोड असणारे व इतर कागदपत्रे आवश्यक*) महाडीबीटी संकेतस्थळावर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरावे. अर्ज सादर करताना current course details मध्ये fees paid म्हणून प्रवेशावेळी अभ्यासक्रमाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरल्यामुळे शुन्य शुन्य ऐवजी शुल्क पावती वरील रक्कम नमूद करावी.

* **SC व ST** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा पर्याय निवडण्यासाठी विद्यार्थ्यांकडे प्रवेशावेळी अत्यावश्यक दस्तऐवज [ *जसे २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणारे उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य अधिवास/ रहिवासी प्रमाणपत्र बारकोड असणारे, जात प्रमाणपत्र बारकोड असणारे व इतर कागदपत्रे आणि फक्त अनुसूचित जमाती (S.T.) विद्यार्थ्यांकरिता* ***"नोकरी करत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र"*** *(Affidavit)] असणे आवश्यक आहे*]. अन्यथा अभ्यासक्रमाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरुन प्रवेश घेता येईल. मात्र त्यानंतरही पात्र विद्यार्थी अत्यावश्यक कागदपत्रांची पूर्तता पूर्ण करुन शासनाच्या विहित मुदतीत महाडिबीटी संकेतस्थळावर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करु शकतात. शिष्यवृत्ती रक्कमेचा परतावा शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा होतो. जे विद्यार्थी संपूर्ण शुल्क भरुन प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना current course details मध्ये fees paid म्हणून प्रवेशावेळी अभ्यासक्रमाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरल्यामुळे शुन्य शुन्य ऐवजी शुल्क पावती वरील रक्कम नमूद करावी.

(अंशतः सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरुन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या डीबीटी सेलचे नमुन्यातील हमीपत्र भरुन संस्थेत जमा करणे बंधनकारक आहे.)

* संस्थेतील **M.Com.(Business Management), M.A. Public Relations, M.A. Communication and Journalism** हे अभ्यासक्रम शासनाच्या महाडीबीटी संकेतस्थळावर व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून नमूद आहेत, त्यामुळे या अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरण्याचा लाभ घेतला तर भविष्यात पुढील अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्ती लाभावर त्याचा परिणाम होईल याची नोंद संबंधित विद्यार्थ्यांनी घ्यावी. (शिष्यवृत्ती योजनेचा लाभ फक्त कोणत्याही दोन व्यावसायिक (Professional) अभ्यासक्रमांसाठी घेता येतो. एकदा व्यावसायिक (Professional) अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला तर भविष्यात अव्यावसायिक / बिगर व्यावसायिक (Non Professional) अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येत नाही). **यामुळे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यायचा किंवा नाही यासाठी सारासार विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा**. याबाबतचे महाडीबीटी संकेतस्थळावर नमूद असणारे नियम व शासन निर्णय वाचले आहेत, याबाबतचे हमीपत्र संस्थेत जमा केल्यानंतरच योग्य अर्ज ऑनलाईन पद्धतीने समाज कल्याण विभागाकडे शिष्यवृत्ती मंजूरीच्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येईल.

* संस्थेतील M.A. (Education), P.G. D.F.M., M.C.A. and M.M.S. या अभ्यासक्रमांना कोणतीही शिष्यवृत्ती योजना मंजूरी नाही.

* सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शिष्यवृत्ती योजनांच्या पात्रतेच्या निकषांनुसार चालू वर्षासाठी विद्यार्थ्यांची **किमान ७५% उपस्थिती अनिवार्य** आहे. त्यामुळे वैयक्तिक संपर्क कार्यक्रम अभ्यास केंद्रावर (पीसीपी) Personal Contact Programme (PCP) Centres वर / ऑनलाईन व्याख्याने (Lecture) आयोजित होणाऱ्या संपर्क सत्रांना ७५% किंवा त्यापेक्षा जास्त उपस्थित राहण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील, विद्यार्थ्यांनी या उपस्थिती बाबतचे "हजेरी हमीपत्र" लिहून द्यावे.

* दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमास राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून, सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरुन, घेतलेला प्रवेश तात्पुरता निश्चित करण्यात येतो.

*** शासनाकडून शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर, संस्थेस देय असणारी प्रवेश शुल्क रक्कम संस्थेत संपूर्णपणे जमा झाल्यानंतरच शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचा प्रवेश पक्का करण्यात येतो.**

* शिष्यवृत्ती योजनेचा पर्याय निवडून प्रवेशावेळी अंशतः शैक्षणिक शुल्क भरुन सवलतीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अंतिम परीक्षेपूर्वी एकूण अभ्यासक्रमाची संपूर्ण शैक्षणिक शुल्क रक्कम संस्थेत जमा करणे बंधनकारक आहे.

.....४/-

*** शिष्यवृत्ती लाभ घेण्यासाठी राखीव प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनीच, त्या शैक्षणिक वर्षातच विहीत मुदतीत, शिष्यवृत्ती योजनेच्या निकषा नुसार ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.**

* ऑनलाईन शिष्यवृत्ती करीता विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या तारखेपासून पुढील **एक महिन्याच्या आत** महाराष्ट्र राज्य शासनाच्या महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती करीता परीपुर्ण अर्ज करणे आवश्यक आहे. **किंवा**

समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे "आपले सरकार डीबीटी पोर्टल" वर ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची लिंक कार्यान्वित करण्यात आल्यानंतर **एक महिन्याच्या आत** **https://mahadbt.maharashtra.gov.in/** या पोर्टलवर जाऊन शिष्यवृत्ती करीता अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

* **लक्ष द्या** - अर्ज स्वीकृती सुरू झाले आहे का? याचा जाहीर दिनांक महाडीबीटी संकेतस्थळावर तपासावा.

* **निर्धारित वेळेत** ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यात अयशस्वी झालात किंवा एखाद्या कारणास्तव शासनाकडून शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आली तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी आकारण्यात येणारे संपूर्ण शैक्षणिक शुल्क (उर्वरित रक्कमेचा फरक वगळून) दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात एकरकमी भरावे लागेल. किंवा मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्रमांक बि.क./भा.स.शि.(२४)/३६०/२००४, दिनांक २५ ऑगस्ट, २००४ नुसार तुमचे गुणपत्रक व प्रमाणपत्र राखीव ठेवण्यात येईल. किंवा तुम्ही संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरले नाही तर विद्यार्थ्याचा दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील (पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्थेतील) अभ्यासक्रमाचा प्रवेश रद्द होईल.

* विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून कोणत्याही कारणास्तव वंचित राहिल्यास दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. त्यामुळे होणाऱ्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्याची राहील.

* शिष्यवृत्ती योजना ही केंद्र व राज्य शासनाची असून शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून महाडीबीटी संकेतस्थळावर राबविण्यात येते.

* शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी "अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे" https://mahadbt.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर कृपया काळजीपूर्वक वाचा.

* सदर संकेतस्थळावर संबंधित शिष्यवृत्ती बद्दलचे शासन निर्णय उपलब्ध आहेत, अधिक माहितीसाठी त्याचेही वाचन करावे.

.....५/-

* शिष्यवृत्ती बद्दल शासनाच्या अटी व शर्ती चे पालन करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

* दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (C.D.O.E.) मधील ज्या अभ्यासक्रमांचा समावेश महाडिबीटी संकेतस्थळावर नसेल, अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या "राखीव प्रवर्ग" विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक शुल्क एकरकमी भरावे लागेल.

* शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊन राखीव प्रवर्गासाठी असलेले अंशतः सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरुन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून संस्थेस प्राप्त झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिली असेल तर गुणपत्रिका तोपर्यंत रोखून ठेवण्यात येईल जोपर्यंत त्या विद्यार्थ्यांचे शुल्क संस्थेस प्राप्त होत नाही.

* विद्यार्थ्यांनी अर्जात स्वतःचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी द्यावा.

* सायबर कॅफे चालक, मित्रमंडळी, नातेवाईक यांचे मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी नमूद करु नयेत.

* ईमेल आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

* मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी शैक्षणिक सत्र पूर्ण होईपर्यंत सुरू ठेवावे.

* संस्थेकडून व महाडीबीटी कडून वेळोवेळी भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेश (Mobile SMS) व ईमेल वर पाठविण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

* महाडीबीटी संकेतस्थळावरील लॉगिन मध्ये शिष्यवृत्ती संबंधित असणारे मॅसेज देण्यात येतात. विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे की लॉगिन मध्ये असणारे संदेश वेळोवेळी तपासणे, व आवश्यक ती पूर्तता करणे.

* विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती पहाण्यासाठी एसएमएस, ईमेल आणि महाडिबीटी पोर्टल सतत तपासावे. कारण अर्जात त्रुटी असल्यास, त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. विद्यार्थ्यांनी त्रुटींची पूर्तता करुन तातडीने **Re-Apply** करावे लागते.

* mahaDBT संकेतस्थळावर पहिल्यांदाच शिष्यवृत्ती अर्ज सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New अर्ज भरावा व ज्यांना शिष्यवृत्तीचा लाभ जमा झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी Renewal अर्ज भरावा.

* **शिष्यवृत्ती अर्ज भरताना पुढील सूचना पाळाव्यात :-**

* **०१) विद्यार्थ्यांनी स्वतःचे नाव काळजीपूर्वक लिहावे. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिके वरील नावानुसार दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रवेश अर्जावर नाव असावे, तसेच नाव महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज भरताना लिहावे. नावाचा क्रम बदलू नये. नावाची स्पेलिंग चुकवू नये.**

* **०२) महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना current course details मध्ये fees paid म्हणून ०० (शून्य शून्य) रक्कम नमूद करावी.**

* **प्रवेश शुल्क पावती सोबत ऑनलाईन प्रवेश अर्जाचे पहिले पृष्ठ एकत्रित स्कॅन करुन अपलोड करावे.**

* **०३) महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना College Name येथे Centre for Distance and Online Education, University of Mumbai (10570) असे नाव लिहावे.**

* **०४) महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना अभ्यासक्रम अनुदान मान्यता प्रकार (Course Grant Type) येथे Aided व Unaided पर्यायापैकी विनाअनुदानित (Unaided) / Non Granted पर्याय निवडावा.**

* **०५) महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना कोर्स डिटेल्स मध्ये Distance Mode हा पर्याय निवडावा.**

* **०६) दुहेरी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फक्त एकाच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती अर्ज करता येईल.**

.....७/-

*** ०७) महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यानंतर सात दिवसाच्या आत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक भासाशि-२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दिनांक १७ मार्च, २०२२ नुसार सोबत जोडलेले नमुना " हमीपत्र " भरुन संस्थेत जमा करणे बंधनकारक आहे.**

*** हमीपत्रासोबत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाची छायाप्रत, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी.डी.ओ.इ.) चा प्रवेश अर्ज, शुल्क पावती, शैक्षणिक श्रेयांक पतपेढी (ए.बी.सी. आय.डी. Academic Bank of Credit ID), डी. ई. बी. आय.डी. [Distance Education Bureau (DEB ID)] देखील जमा करावे.**

*** संबंधित कागदपत्रे जमा करण्यासाठी संस्थेचा पत्ता :- कक्ष क्रमांक १०८-अ, शिष्यवृत्ती व पात्रता विभाग, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, डॉ. शंकर दयाळ शर्मा भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी कॅम्पस, कालिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.**

*** संबंधित कागदपत्रे कार्यालयीन कामकाजाच्या दिवसात म्हणजे सोमवार ते शुक्रवार व विषम शनिवार (१, ३ व ५ वा शनिवार) सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत (जेवणाची वेळ वगळून १ ते १.३०) जमा करावेत. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार व सार्वजनिक सुट्टी या दिवशी कार्यालय बंद असते, याची नोंद घ्यावी.**

*** ०८) विद्यार्थ्यांकडून संस्थेस शिष्यवृत्ती अर्ज व हमीपत्र प्राप्त झाल्यानंतरच योग्य अर्ज ऑनलाईन पद्धतीने समाज कल्याण विभागाकडे शिष्यवृत्ती मंजूरीच्या पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरित करण्यात येतील.**

* विद्यार्थ्यांने शिष्यवृत्ती अर्ज भरला म्हणजे शिष्यवृत्ती मंजूर झाली असा गैरसमज करुन घेऊ नये.

* शिष्यवृत्ती अर्ज संस्थेकडून व प्रवर्गाशी संबंधित विभाग (समाजकल्याण कार्यालय, मुंबई उपनगर; आदिवासी विकास विभाग, मुंबई उपनगर व उच्च शिक्षण विभाग, पुणे) यांचे मार्फत शिष्यवृत्ती अर्जाची व सोबतच्या दस्तावेजांची तपासणी झाल्यानंतर अर्जात आढळलेल्या त्रुटींची पूर्तता विद्यार्थ्यांकडून न केल्यास शिष्यवृत्ती अर्ज रद्द होऊ शकतो.

* कुठल्याही कारणास्तव अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती अर्ज संस्थेकडून अनावधानाने संबंधित विभागाकडे अग्रेषित झाला व त्यानंतर संबंधित विभागाकडून नामंजूर केला किंवा अपात्र ठरविल्यास शिष्यवृत्ती देय नाही.

* शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारे मूळ कागदपत्रे / मूळ दस्तावेज स्कॅन करुन वेबसाईटवर अपलोड करावे लागतात.

* *ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांकडे मूळ डॉक्युमेंट तयार असावेत यासाठी स्वतंत्र यादी दिली आहे. यापैकी आपणास जे कागदपत्रे लागू असणार ते कागदपत्रे तयार ठेवावेत*:-

०१) जात प्रमाणपत्र (बारकोड असणारे).

०२) उत्पन्न प्रमाणपत्र (प्रवेशावेळील आर्थिक वर्षाचे).

०३) जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र (व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी).

०४) महाराष्ट्र राज्याचे अधिवास / रहिवासी प्रमाणपत्र (बारकोड असणारे डोमिसाईल).

०५) १० वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

०६) १२ वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

०७) मागील / गत वर्षीच्या उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

०८) शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.

०९) शिक्षणात खंड असल्यास अंतर / खंड प्रमाणपत्र. (Gap Cert.)

१०) वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक असल्यास.

११) राजपत्र नावात बदल असल्यास. (Gazzette)

१२) शिधापत्रिका. (Ration Card)

१३) नोकरी करत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit). (फक्त अनुसूचित जमाती साठी).

१४) आधार संलग्नीकृत सीडिंग राष्ट्रीयकृत बँक खाते.

(बँकेचे पासबुक - विद्यार्थ्याचे नाव, खाते क्रमांक, बँकेचा IFSC क्रमांक, बँकेचा पत्ता असणारे पान)

१५) स्व घोषणापत्र (Self Declaration with Govt. Format).

१६) Non Creamy Layer (VJNT, OBC & SBC).

१७) फोटो - अलिकडील काळातील पासपोर्ट साइज.

मुंबई विद्यापीठ
University of Mumbai
Re-Accredited A++ Grade (CGPA 3.65) by NAAC
Category I University by UGC
Estd. 1971
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)
(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था)
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION (CDOE)
(FORMERLY INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING (IDOL))
Dr. Shankar Dayal Sharma Bhavan, Vidyanagari, Santacruz (E.), Mumbai - 400 098.
Website : mu.ac.in/distance-open-learning
Email : info@idol.mu.ac.in



*** महाडीबीटी संकेतस्थळावर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना जर काही मूळ दस्तावेज अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नसेल तर खालीलप्रमाणे एकापेक्षा जास्त मूळ दस्तावेज एकत्र स्कॅन करुन अपलोड करु शकतात.**

०१) जात **प्रमाणपत्रासोबत** जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र (व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी).

०२) जात **प्रमाणपत्रासोबत** नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (VJNT/OBC/SBC प्रवर्गासाठी)

०३) उत्पन्न **प्रमाणपत्रासोबत** आईचा उत्पन्न दाखला असल्यास वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र **किंवा** अर्जदार विवाहित स्त्री असल्यास पतीच्या उत्पन्न **प्रमाणपत्रासोबत** विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

०४) शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र **सोबत** नाव बदलाचे राजपत्र किंवा शिक्षणातील खंड प्रमाणपत्र.

०५) १० वी उत्तीर्ण **सोबत** अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

०६) १२ वी उत्तीर्ण **सोबत** अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

०७) मागील / गत वर्षीच्या उत्तीर्ण **सोबत** अनुत्तीर्ण गुणपत्रिका.

*** प्रवर्गानुसार आवश्यक असणारे कागदपत्रे खालीलप्रमाणे :-**

**१) <u>अनुसूचित जाती</u> <u>Documents Required for SC</u> :-**

- जात प्रमाणपत्र (बारकोड असणारे) (विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौद्ध असावा).
- **उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार द्वारे प्रदान) (वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे).**
- १० वी / १२ वी परीक्षेची गुणपत्रिका.
- गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका.
- वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास).
- शिक्षणातील खंड बाबतचे आणि स्व: घोषणापत्र (आवश्यक असल्यास). (Gap Cert. Self Declaration, if Required)
- पतिचे उत्पन्न प्रमाणपत्र (अर्जदार जर स्त्री आहे आणि विवाहीत असल्यास) वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी.
- अधिवास / रहिवासी / डोमिसाईल प्रमाणपत्र (बारकोड असणारे). (विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा)

.....१०/-

२) **अनुसूचित जमाती Documents Required for ST** :-

• जात प्रमाणपत्र (बारकोड असणारे) (अनुसूचित जमाती).

• व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जाति वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**• कौटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र (कौटुंबिक उत्पन्न <= २,५०,०००).**

• १० वी परीक्षेची गुणपत्रिका.

• मागील वर्षाचे गुणपत्रिका.

• अधिवास / रहिवासी / डोमिसाईल प्रमाणपत्र (बारकोड असणारे). (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा).

• नोकरी करत नसल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit).

३) **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग Documents Required for VJNT/OBC/SBC** :-

• जात प्रमाणपत्र (बारकोड असणारे) - सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे. (महाराष्ट्र शासनाद्वारे जारी केलेले).

वास्तव्याचा पुरावा म्हणून हे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

• जात पडताळणी प्रमाणपत्र - व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम, व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अनिवार्य. बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य नाही.

**• उत्पन्न प्रमाणपत्र / मिळकत घोषणापत्र. सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे. (वार्षिक उत्पन्न रू. १.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे).**

• १० वी / १२ वी परीक्षेची गुणपत्रिका किंवा गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका.

• अंतर प्रमाणपत्र - शिक्षणामध्ये खंड असल्यास हे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. (Gap Cert.)

• वडिलांचे / पालकांचे मृत्यू प्रमाणपत्र (लागू असल्यास).

• शिधापत्रिका - कुटुंबातील मुलांची एकूण संख्या ओळखण्यासाठी (केवळ दोन अपत्य) (Ration Card)

(i) मुलींसाठी हि अट बंधनकारक नाही. (ii) एकाच पालकाची जास्तीत जास्त २ मुले शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील.).

• शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.

• एकूण लाभार्थी मुलांच्या संख्येबाबत आई-वडिलांचे / पालकांचे घोषणापत्र. (Declaration Cert.)

• अधिवास / रहिवासी / डोमिसाईल प्रमाणपत्र (बारकोड असणारे) (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा).

.....११/-

मुंबई विद्यापीठ
University of Mumbai
Re-Accredited A++ Grade (CGPA 3.65) by NAAC
Category 1 University by UGC
Estd. 1971
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)
(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था)
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION (CDOE)
(FORMERLY INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING (IDOL))
Dr. Shankar Dayal Sharma Bhavan, Vidyanagari, Santacruz (E.), Mumbai - 400 098.
Website : mu.ac.in/distance-open-learning
Email : info@idol.mu.ac.in



* अर्जदाराने (त्याने / तिने) व्यावसायिक ते बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम बदलल्यास अर्जदार शिष्यवृत्तीसाठी पात्र नसेल परंतु बिगर व्यावसायिक ते व्यावसायिक अभ्यासक्रम बदलल्यास अर्जदार शिष्यवृत्तीसाठी पात्र असेल.

* एक कोर्स पूर्ण होईपर्यंत अर्जदाराची शिष्यवृत्ती / फ्रीशिप चालू राहील. उदाहरणार्थ - १० वी, १२ वी कला - बी.ए., एम.ए., एम.फिल., पी.एच.डी., इत्यादी. अर्जदाराने बी.ए. आणि बी.एड. पूर्ण केले आणि नंतर एम.ए. साठी प्रवेश घेतल्यानंतर, एम.ए. अभ्यासक्रमासाठी त्याला / तिला शिष्यवृत्तीसाठी परवानगी दिली जाणार नाही. पण बी.एड. नंतर एम.बी.ए. मध्ये प्रवेश केल्यानंतर ते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील कारण तो व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे.

* विशेष व्यावसायिक / बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी, त्या शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती / फ्रीशिपचा लाभ घेतला असल्यास आणि दरम्यान सध्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमातून बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छित अर्जदारास पुढील अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

* मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्ती हेडिंग अंतर्गत उपलब्ध असणारी शिष्यवृत्तीची माहिती वाचावी. याशिवाय दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अधिकृत फेसबुक पेज, व्हाटस् ॲप चॅनल, टेलिग्राम गृप, ट्विटर आदिवर शिष्यवृत्ती संबंधित माहिती/सूचना विद्यार्थ्यांसाठी टाकण्यात येतात, यासाठी विद्यार्थ्यांनी या सोशल मीडियांना जॉईन व्हावे.

दिनांक :- १५ मे, २०२५.
मुंबई - ४०० ०९८.

प्रा. (डॉ.) शिवाजी सावित्री धोंडीराम सरगर
संचालक,
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी.डी.ओ.ई.),
(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था).

मुंबई विद्यापीठ

क्र. डिबीटी_सेल/आयसीडी/२०२१- २२/८

मुंबई - ४०० ०९८.

२० ऑगस्ट, २०२२.

हमीपत्र

शासन निर्णय क्र. भासशि-२०२२/प्र.क्र. ७४/शिक्षण-१, दिनांक १७ मार्च, २०२२.

मी. (विद्यार्थ्याचे नाव) ________________________________________ , (विभागाचे नाव) दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (C.D.O.E.) या विभागामध्ये (विषय) ________________________________________ या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असून शैक्षणिक वर्ष २०____-२०____ या कालावधीमध्ये मी, महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) साठी अर्ज केला असून मला अनुज्ञेय असलेल्या शैक्षणिक शुल्कापैकी केंद्र शासनाच्या वतीने ६०% च्या हिश्शाचे वितरण महाडिबीटी प्रणालीवर माझ्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनामार्फत DBT (Direct Benefit Transfer) तत्वावर वितरित करण्यात येणार आहे. त्यामुळे मी शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठास देय असणाऱ्या शुल्काचा भाग (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, व इतर नापरतावा शुल्क इत्यादी) सदर ६०% रक्कम केंद्र शासनाकडून माझ्या खात्यामध्ये जमा झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत मी, संस्था/महाविद्यालय/विद्यापीठास अदा करेन.

मी अनुसूचित जाती (SC) /अनुसूचित जमाती (ST) /इतर मागास प्रवर्ग (OBC / VJNT/SBC) /~~आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS)~~ या प्रवर्गामध्ये मोडत असून मी शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्क/फी मध्ये सवलत मिळण्यासाठी शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) चा अर्ज mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर निर्देशित केल्यानुसार करणे बंधनकारक असल्याबाबतचे मला मी शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठाने अवगत केले आहे. शैक्षणिक शुल्क/फी मध्ये सवलत मिळण्यासाठी शिष्यवृत्ती/DBT (Direct Benefit Transfer) चा अर्ज जर मी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भरला नाही किंवा अर्ज परिपूर्ण नाही म्हणून शासनाने/संस्था/महाविद्यालय/विद्यापीठाने माझ्याकडे परत पाठवला किंवा शासनाच्या संबंधित विभागाकडून रद्द (Reject) केला तर मला सर्वसाधारण प्रवर्गासाठी (General Category) आकारण्यात येणारे पूर्ण शुल्क भरावे लागेल असे अवगत करण्यात आले आहे आणि ते मला मान्य आहे. संबंधित विद्यापीठ परिपत्रक क्र. वि.क./भा.स.शि.(२४)/३६०/२००४ मी वाचले आहे.

शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक :- ____________________

C.D.O.E. प्रवेश अर्ज क्रमांक :- ________________

विद्यार्थ्याची सही :- ____________________

विद्यार्थ्याचे नाव :- ____________________

शिष्यवृत्ती लिपीक सही :- ________________

विभाग प्रमुख

(सही व शिक्का)

दिनांक :-

स्थळ :-

# मुंबई विद्यापीठ
# दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र

<u>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ पर्याय निवडून राखीव प्रवर्गासाठी असलेले सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरुन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हमीपत्र.</u>

श्री / श्रीमती / कु. ______________________________________ मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात __________________________ अभ्यासक्रमासाठी २०__ - २०__ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला आहे. माझा सी.डी.ओ.ई. प्रवेश अर्ज क्रमांक ______________________ आहे. मी ________ प्रवर्गातील असून महाडीबीटी संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक _______________ आहे.

मी शिष्यवृत्ती योजनेचा पर्याय स्वीकारुन राखीव प्रवर्गासाठी असलेले सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरुन दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेश घेतला आहे. मी पुढील बाबींसाठी हमीपत्र देत आहे.

**०१)** मी शासनाच्या महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर केला आहे / करणार आहे.

**०२)** मी मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली शिष्यवृत्ती बाबतची माहिती संपूर्ण वाचली आहे. यातील सूचनांचे तंतोतंत पालन करेन.

**०३)** संस्थेच्या संपर्क अभ्यास केंद्रावर (पीसीपी सेंटर - Personal Contact Programme Centres) किमान ७५% उपस्थित राहण्याची मी हमी देत आहे.

**०४)** मी सादर केलेला ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास / अपात्र ठरल्यास / शासनाकडून विहित मुदतीत संस्थेच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती रक्कम जमा न झाल्यास त्वरित एकरकमी, संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरेन, याची मी हमी देत आहे

**०५)** मी संस्थेकडून व महाडीबीटी संकेतस्थळावरुन कोणत्याही मार्गाने मला प्राप्त होणाऱ्या सूचनांचे पालन करण्याची हमी देत आहे.

**०६)** शिष्यवृत्ती संदर्भातील माहिती/सूचना मिळवण्यासाठी दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अधिकृत फेसबुक पेज, व्हॉट्सॲप चॅनल, टेलिग्राम गृप, ट्विटर आदि सोशल मीडिया जॉईन करेन.

**०७)** मी दुहेरी अभ्यासक्रमापैकी फक्त एकाच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेईन, याची हमी देत आहे.

दिनांक :- ___________ .  विद्यार्थ्याची स्वाक्षरी :- __________________________

ठिकाण - मुंबई - ४०० ०९८.  विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव :- __________________________

## मुंबई विद्यापीठ
## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### <u>७५% उपस्थिती हमीपत्र</u>

श्री / श्रीमती / कु. ________________________________________ मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात _________________________ अभ्यासक्रमासाठी २०__ - २०__ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला आहे. माझा सी.डी.ओ.ई. प्रवेश अर्ज क्रमांक ______________________ आहे. मी ________ प्रवर्गातील असून महाडीबीटी संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक _______________ आहे.

शासनाच्या शिष्यवृत्ती पात्रतेच्या निकषांनुसार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची चालू शैक्षणिक वर्षात किमान ७५% टक्के उपस्थिती आवश्यक आहे. याबाबत मला माहिती असून संस्थेच्या संपर्क अभ्यास केंद्रावर (Personal Contact Programme Centres) हजर राहण्याची जबाबदारी माझी आहे.

दिनांक :- __________ .                विद्यार्थ्यांची स्वाक्षरी :- _________________________

ठिकाण - मुंबई - ४०० ०९८.                विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव :- ________________________

## मुंबई विद्यापीठ
## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## M.A. Communication & Journalism, M.A. Public Relations and M.Com.(Business Management) हमीपत्र.

श्री / श्रीमती / कु. ________________________________________ मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात __________________________ अभ्यासक्रमासाठी २०__ - २०__ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला आहे. माझा सी.डी.ओ.ई. प्रवेश अर्ज क्रमांक ________________________ आहे. मी ________ प्रवर्गातील असून महाडीबीटी संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक ________________ आहे.

शासनाच्या शिष्यवृत्ती पात्रतेच्या निकषांनुसार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ फक्त "कोणत्याही दोन व्यावसायिक (Professional) अभ्यासक्रमांसाठी घेता येतो. एकदा व्यावसायिक (Professional) अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला तर भविष्यात अव्यावसायिक / बिगर व्यावसायिक (Non Professional) अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येत नाही". याबाबतचे महाडीबीटी संकेतस्थळावर नमूद असणारे नियम व शासन निर्णय मी वाचले आहेत.

त्यामुळे या अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत सवलतीचे शैक्षणिक शुल्क भरण्याचा लाभ घेतला तर भविष्यात पुढील अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्ती लाभावर त्याचा परिणाम होईल, याची मला माहिती असून शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यायचा किंवा नाही यासाठी सारासार विचार करुन योग्य तो निर्णय मी घेतला आहे.

**मला शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यायचा आहे**.

दिनांक :- ___________ .        विद्यार्थ्याची स्वाक्षरी :- ___________________________

ठिकाण - मुंबई - ४०० ०९८.        विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव :- _________________________

| | |
|---|---|
| Department | Social Justice and Special Assistance Department. |
| विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. |
| | |
| Caste Category | Schedule Caste. (SC) |
| जात प्रवर्ग | अनुसूचित जाती. |
| | |
| Scholarship Scheme 1 | **Govt. of India Post-Matric Scholarship.** |
| शिष्यवृत्ती योजना १ | **भारत सरकार पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.** |
| | |
| Eligibility :- | 1. Student category shall belong to Scheduled Caste or Navbouddha.<br>2. The parents/guardian annual income shall be less than or equal to Rs. 2,50,000/-.<br>3. Student shall belong to resident of Maharashtra.<br>4. Student should be passes SSC/equivalent Matric.<br>5. Failure : if student fail first time then should avail Exam fees & maintenance allowance. If fails second time in same class, then he/she will not get any allowance and after two drops he will pass and go to next class then he will be eligible.<br>6. Only Two (2) professional courses are allowed.<br>7. 75 % attendance is mandatory for current year. |
| पात्रता :- | १. विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौद्ध असावा.<br>२. आई-वडिलांचे / पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>३. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.<br>४. विद्यार्थी शालांत परीक्षा किंवा इतर समकक्ष मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>५. अयशस्वी : विद्यार्थी प्रथम वर्षी नापास झाला तरी त्याला परीक्षा शुल्क आणि देखभाल भत्ता अनुज्ञेय राहील, एकाच वर्गात दुसऱ्या प्रयत्नात सुद्धा अनुत्तीर्ण झाल्यास त्याला / तिला कोणताही भत्ता मिळणार नाही. आणि दोन प्रयत्नानंतर विद्यार्थी उत्तीर्ण होऊन पुढील वर्गात गेल्यास लाभ अनुज्ञेय राहतील.<br>६. फक्त २ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी.<br>७. चालू वर्षासाठी ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. |
| | |
| Documents Required :- | * Cast Certificate.<br>* Income Certificate (Provided by Tahesildar).<br>* Domicile Certificate.<br>* Mark sheet for SSC / HSC.<br>* Mark sheet for last appeared examination.<br>* Gap Cert. & Self Declaration (if required).<br>* Father Death Certificate (if required).<br>* Husband Income Certificate (if girl is married).<br>* Aadhaar linked seeding to Bank Account.<br>* Academic Bank of Credits ID (ABC ID)<br>* Distance Education Bureau (DEB ID) |
| आवश्यक कागदपत्रे :- | * जात प्रमाणपत्र.<br>* उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार द्वारे प्रदान).<br>* अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र.<br>* १० वी / १२ वी परीक्षेची गुणपत्रिका.<br>* गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका.<br>* शिक्षणातील खंड बाबतचे अंतर प्रमाणपत्र आणि स्व: घोषणापत्र (आवश्यक असल्यास).<br>* वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास).<br>* पतीचे उत्पन्न प्रमाणपत्र (अर्जदार मुलगी जर विवाहित स्त्री असल्यास).<br>* आधार संलग्नीकृत सीडिंग बँक खाते.<br>* शैक्षणिक श्रेयांक पतपेढी (ए.बी.सी. आय.डी.)<br>* डी. ई. बी. आय.डी. |

| | |
|---|---|
| Department | Tribal Development Department. |
| विभाग | आदिवासी विकास विभाग. |
| | |
| Caste Category | Scheduled Tribes. (ST) |
| जात प्रवर्ग | अनुसूचित जमाती. |
| | |
| Scholarship Scheme 2 | **Post-Matric Scholarship Scheme (Govt. of India).** |
| शिष्यवृत्ती योजना २ | **भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती.** |
| | |
| Eligibility :- | 1. Applicable for Scheduled Tribes only.<br>2. If Family Income <= 2,50,000/-, he will get the scholarship.<br>3. Student shall belong to resident of Maharashtra.<br>4. Minimum 10th Pass.<br>5. Back to back drop for 2 years he/she will not be allowed to fill form.<br>6. 75 % attendance is mandatory for current year. |
| पात्रता :- | १. फक्त अनुसूचित जमाती साठी लागू.<br>२. जर कौटुंबिक उत्पन्न <= २,५०,०००/- असेल तर त्याला शिष्यवृत्ती मिळेल.<br>३. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.<br>४. किमान १० वी उत्तीर्ण.<br>५. परत दोन (२) वर्षांच्या ड्रॉपसाठी परत फॉर्म भरण्याची परवानगी दिली जाणार नाही.<br>६. चालू वर्षासाठी ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. |
| Documents Required :- | * Caste Certificate.<br>* Professional Course selected than Caste Validity Certificate mandatory.<br>* Income Certificate.<br>* Domicile Certificate.<br>* Marksheet for SSC / HSC.<br>* Previous year's Marksheet.<br>* Affidavit of non-employment of student on stamp paper of Rs.100/-.<br>* Aadhaar linked seeding to Bank Account.<br>* Academic Bank of Credits ID (ABC ID)<br>* Distance Education Bureau (DEB ID) |
| आवश्यक कागदपत्रे :- | * जात प्रमाणपत्र.<br>* व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जाति वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>* कौटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र.<br>* अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा).<br>* १०वी / १२वी परीक्षेची गुणपत्रिका.<br>* मागील वर्षाचे गुणपत्रिका.<br>* नोकरी करत नसल्याबबातचे प्रतिज्ञापत्र. (Affidavit) [शंभर रुपयाच्या (रु. १००/-) स्टँप पेपरवर).<br>* आधार संलग्नीकृत सीडिंग बँक खाते.<br>* शैक्षणिक श्रेयांक पतपेढी (ए.बी.सी. आय.डी.)<br>* डी. ई. बी. आय.डी. |

| | |
|---|---|
| Department | VJNT, OBC and SBC Welfare Department. |
| विभाग | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय. |
| | |
| Caste Category | Vimukta Jati, Nomadic Tribes Other Backward Class/Special Backward Classes.<br>**DT(A) (VJ), NT(B), NT(C), NT(D).** |
| जात प्रवर्ग | विमुक्त जाती, भटक्या जमाती / इतर मागासवर्ग / विशेष मागास प्रवर्ग. |
| | |
| Scholarship Scheme 3<br>Scholarship Scheme 4<br>Scholarship Scheme 5 | **Post Matric Scholarship to VJNT.**<br>**Post Matric Scholarship to OBC.**<br>**Post Matric Scholarship to SBC.** |
| शिष्यवृत्ती योजना ३<br>शिष्यवृत्ती योजना ४<br>शिष्यवृत्ती योजना ५ | **वि.जा. भ.ज. प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.**<br>**इ.मा.व. प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.**<br>**वि.मा. प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती.** |
| | |
| Eligibility :- | 1) Applicant should be belongs to OBC / VJNT / SBC category.<br>2) The parents/Guardians annual Income should be less than or equal to Rs.1.50 Lac.<br>3) Applicants must be residents of Maharashtra.<br>4) Applicants must be pursuing the education course approved by the government from class Post-Matric.<br>5) If Applicant fails in particular year then he will get the Tuition Fees, Exam Fees and Maintenance allowance of that particular academic year but he/she will not get the benefit until he/she gets promoted to next higher class.<br>6) Applicant should be come through CAP round for only professional courses.<br>7) Only two children (i)any number of girls applicants allowed. ii) boys applicants maximum 2 of the same parents will be eligible for the Scholarship.<br>8) No scholarship will be paid to the Applicants under this scheme from the date he /she accepts another Scholarship / stipend.<br>9) 75 % attendance is mandatory for current year.<br>10) Applicant will be eligible for scholarship if he / she changes the course Non – Professional to Professional but he will not be eligible if he / she changes the course from Professional to Non – Professional.<br>11) Scholarships / ~~Freeship~~ will continue until Applicant completes one course. Ex. - 11th, 12th Arts - B.A., M.A., M.Phil., Ph.D. If, Applicant completed B.A and B.Ed. course and later after taking admission for M.A., for M.A. course He/she will not be allowed for scholarship / ~~freeship~~. But after admission to M.B.A. after B.Ed, it can be eligible for scholarship / ~~freeship~~ as it is a professional postgraduate course.<br>12) Applicant studying in particular professional/Non-Professional course, and availing benefits of scholarship / ~~freeship~~ for that academic course and if he/she wants to change his existing Professional/Non-Professional course in between academic years he/she will not be eligible for scholarship / ~~freeship~~ for further course.<br>**13) Maintenance allowance & Exam Fees are paid to Applicant if Applicant get promoted to next higher class. (for VJNT Only).** |
| पात्रता :- | १. अर्जदार हा इतर मागासवर्ग / विमुक्त जाती, भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग श्रेणीतील असावा.<br>२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>३. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>४. अर्जदारांनी शालान्त पूर्व श्रेणीमध्ये शासनाकडून मंजूर केलेल्या शैक्षणिक कोर्सचा पाठपुरावा केला पाहिजे.<br>५. जर अर्जदार विशिष्ट वर्षामध्ये अयशस्वी झाला तर त्याला त्या शैक्षणिक वर्षाचे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आणि देखभाल भत्ता मिळेल, परंतु पुढील उच्च श्रेणीत त्याला बढती मिळत नाही तोपर्यंत त्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.<br>६. केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी अर्जदार CAP राऊंड च्या माध्यमातून येणे आवश्यक आहे.<br>७. केवळ दोन अपत्य :-<br>i) मुलींसाठी हि अट बंधनकारक नाही.<br>ii) एकाच पालकची जास्तीत जास्त २ मुले शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील.<br>८. दुसरी कुठलीही शिष्यवृत्ती / वेतनरोख स्विकारल्यास या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अंतर्गत अर्जदारांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>९. चालू वर्षासाठी ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.<br>१०. अर्जदाराने (त्याने / तिने) व्यावसायिक ते बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम बदलल्यास अर्जदार शिष्यवृत्तीसाठी पात्र नसेल परंतु बिगर व्यावसायिक ते व्यावसायिक अभ्यासक्रम बदलल्यास अर्जदार शिष्यवृत्तीसाठी पात्र असेल.<br>११. एक कोर्स पूर्ण होईपर्यंत अर्जदाराची शिष्यवृत्ती / ~~फ्रीशिप~~ चालू राहील. उदाहरणार्थ - १० वी, १२ वी कला - बी.ए., एम.ए., एम.फिल., पी.एच.डी., इत्यादी. अर्जदाराने बी.ए. आणि बी.एड. पूर्ण केले आणि नंतर एम.ए. साठी प्रवेश घेतल्यानंतर, एम.ए. अभ्यासक्रमासाठी त्याला / तिला शिष्यवृत्ती / ~~फ्रीशिप~~ साठी परवानगी दिली जाणार नाही. पण बी.एड. नंतर एम.बी.ए. मध्ये प्रवेश केल्यानंतर ते शिष्यवृत्ती / ~~फ्रीशिप~~ साठी पात्र ठरतील कारण तो व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे.<br>१२. विशेष व्यावसायिक / बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी, त्या शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती / ~~फ्रीशिप~~ चा लाभ घेतला असल्यास आणि दरम्यान सध्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमातून बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छित अर्जदारास पुढील अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती / ~~फ्रीशिप~~ चा लाभ मिळणार नाही.<br>**१३. अर्जदाराने पुढील उच्च श्रेणीमध्ये पदोन्नती केली तर अर्जदारांना देखभाल भत्ता व परीक्षा शुल्क दिले जाते. (विमुक्त जाती, भटक्या जमाती साठी)** |

Contd.2/-

VJNT, OBC and SBC.

| | |
|---|---|
| Documents Required :- | * Caste Certificate - should be issued by competent authority (Issued by Govt. of Maharashtra) This certificate considered as Proof of Resident.<br>* Caste Validity Certificate – (Mandatory for Professional Degree courses, Professional Post Graduate. For Non Professional courses caste validity is not mandatory).<br>* Income Certificate / Income Declaration - should be issued by competent authority<br>* Domicile Certificate.<br>* SSC / HSC Marksheet<br>* Last examination marksheet.<br>* Gap certificate - Not mandatory but in case of gap it is mandatory.<br>* Leaving Certificate.<br>* Ration Card for identify number of children in family.<br>* Declaration certificate of parents/guardians about number of children beneficiaries.<br>* If applicable Father/Guardians Death Certificate.<br>* Aadhaar linked seeding to Bank Account.<br>* Academic Bank of Credits ID (ABC ID)<br>* Distance Education Bureau (DEB ID) |
| आवश्यक कागदपत्रे :- | * जात प्रमाणपत्र - सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे. (महाराष्ट्र शासनाद्वारे जारी केलेले) वास्तव्याचा पुरावा म्हणून हे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.<br>* जात पडताळणी प्रमाणपत्र - व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम, व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अनिवार्य. बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य नाही.<br>* उत्पन्न प्रमाणपत्र / मिळकत घोषणापत्र - सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे.<br>* अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र.<br>* १० वी / १२ वी परीक्षेची गुणपत्रिका.<br>* गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका.<br>* अंतर प्रमाणपत्र - शिक्षणामध्ये खंड असल्यास हे प्रमाणपत्र अनिवार्य असेल.<br>* शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.<br>* शिधापत्रिका - कुटुंबातील मुलांची एकूण संख्या ओळखण्यासाठी.<br>* एकूण लाभार्थी मुलांच्या संख्येबाबत आई-वडिलांचे / पालकांचे घोषणापत्र.<br>* वडिलांचे / पालकांचे मृत्यू प्रमाणपत्र (लागू असल्यास).<br>* आधार संलग्नीकृत सीडिंग बँक खाते.<br>* शैक्षणिक श्रेयांक पतपेढी (ए.बी.सी. आय.डी.)<br>* डी. ई. बी. आय.डी. |

**अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत. (केंद्र हिस्सा निधी वितरण पध्दती)**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक: भासशी-२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ मार्च, २०२२

**वाचा :-**

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (मातं) क्रमांक मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/एस-१/३९, दि. १२.१०.२०१८

२) शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दि. ०८ जानेवारी, २०१९

३) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनाकरीताचे सुधारीत मार्गदर्शक सूचना.

४) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्र. फाईल नं. के- १४०११/२५/२०२१-एससीडी-V, दि. ०१/११/२०२१

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जाती प्रवर्गातील मुला-मुलींनी उच्च शिक्षण घेणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्चविद्याविभुषित होणे, हा उद्देश ठेऊन अनुसूचीत जाती (नवबौध्दासह) विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन १९५९-६० पासून राबविण्यात येत आहे.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुधारीत निधी वितरण कार्यपध्दती राज्यभरात अवलंबवयाची आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०१.११.२०२१ च्या पत्रान्वये सूचित केल्याप्रमाणे सुधारीत निधी वितरण कार्यपध्दतीचा राज्यात अवलंब न केल्यास सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्य शासनास अनुज्ञेय असलेली केंद्रीय अनुदानाच्या रकमेची (केंद्र हिस्सा ६०%) अदायगी करता येणार नाही. तसेच त्या त्या आर्थिक वर्षात प्राप्त होणारे केंद्रीय अनुदान अखर्चित राहिल्यास पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी पुर्नविनियोजन करता येणार नाही असे देखील सूचित करण्यांत आलेले आहे.

सदर बाब विचारात घेता केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील तरतूदी व १०.१ मधील तरतूद स्विकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनामधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील खाली नमुद तरतूदी व १०.१ मध्ये नमुद सूचना स्विकारण्यात येत आहेत.

(१) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली संपूर्ण रक्कम म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे ना-परतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क / भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शासनाने PFMS (Public Finacial Management System) या प्रणालीव्दारे लाभाची अदायगी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.२ नुसार सन २०२१-२२ पासून मंजूर झालेली शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये DBT (Direct Beneficiary Transfer) तत्वावर जमा करण्यांत यावी.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. १०.१ नुसार, सन २०२०-२१ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतीवर्षी अर्थसंकल्पीत करण्यांत येणा-या तरतूदीच्या ६०% केंद्र हिस्सा म्हणून निश्चित करण्यात आलेला असून राज्य शासनाचा उर्वरीत ४०% बांधील खर्च निश्चित करण्यांत आलेला आहे. सदरचे निधी विभागणीचे सूत्रास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे सुधारीत वितरण पध्दतीने अदा करण्यांत येणार आहे.

**(अ) केंद्र शासनाच्या ६० % च्या हिश्श्याचे वितरण :-**

महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत अर्ज संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत मंजूर झाल्यानंतर त्या शैक्षणिक वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कम प्रणालीव्दारे निश्चित करण्यांत येते. सदरहू मंजूर करण्यात आलेली संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम म्हणजेच महाविद्यालयास देय असणारा भाग (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर नापरतावा शुल्क इ. ) तसेच विद्यार्थ्याला देय असणारा भाग (निर्वाह भत्ता) या दोन्ही भागांच्या एकत्रित रक्कमेचा केंद्र हिस्सा ६० % या प्रमाणात लाभाची रक्कम केंद्र शासनाच्या प्रणालीमध्ये निश्चित करण्यांत येणार आहे. उपरोक्त निश्चित करण्यात आलेला केंद्र हिस्सा (६० %) विद्यार्थ्याने महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत केलेल्या अर्जानुसार त्यांच्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनामार्फत DBT तत्वावर वितरीत करण्यांत येणार आहे.

सदरहू केंद्र हिस्सा विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरीत महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.यासाठी संबधीत महाविद्यालयाने त्यांच्याकडून विहित नमुन्यात हमीपत्र घ्यावे.

**(ब) राज्य शासनाच्या ४० % हिश्श्याचे वितरण :-**

उपरोक्त मुद्दा क्र. (२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या एकूण मंजूर झालेल्या रक्कमेच्या केंद्र हिस्सा (६० %) वजा जाता उर्वरीत राज्य हिस्सा (४० %) ची रक्कम राज्य शासनाच्या महाडिबीटी पोर्टल मार्फत वितरीत करण्यांत येईल. सदरहू राज्य हिस्सा सन २०२०-२१ पर्यंतच्या वितरण कार्यप्रणालीनुसार DBT तत्वावर संबंधीत विद्यार्थ्यांचे आधार संलग्नीकृत बँक खाते व संबंधीत महाविद्यालयाचे बँक खात्यामध्ये थेट PFMS प्रणालीव्दारे मंजूर रक्कम वितरीत करण्यांत येईल.

२. सदरहू शासन निर्णय केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र.१०.१, ११.१ व ११.२ पुरता मर्यादीत असून केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या विस्तृत सुधारीत मार्गदर्शक सूचना स्वंतत्रपणे निर्गमीत करण्यात येतील.

३. सदरहू शासन निर्णय नुसार केंद्र योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र. एन-३ (०४) शिष्यवृत्ती आणि विद्यावेतने, (०४) (१६) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, (केंद्रपुरस्कृत १०० टक्के), (कार्यक्रम), ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (**लेखाशीर्ष- २२२५ ०४९५**) मागणी क्र.एन-३(०४) शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने, (०४) (०१) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने लेखाशीर्ष ( **२२२५ ०३५२**) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत येऊन त्याखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( विष्णुदास पुं. घोडके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१०. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. उपसचिव (अर्थसंकल्प)/(विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (का.शिक्षण-१)

मुंबई विद्यापीठ
क्र.वि.क./भा.स.शि.(२४)/३६०/२००४.

परिपत्रक,

विषय :मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची योजने अंतर्गत आकारावयाचे शुल्क.

प्राचार्य/संचालक सर्व अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालये /संस्था तसेच विद्यापीठाचे विविध विभाग प्रमुख/ संचालक, सर्व उपकुलसचिव यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. CONCOL/FEE/190/२००३ , दि.१३ मे, २००३ क्र. PG/1/454 OF 1996 दि. १८ ऑक्टोबर, १९९६, क्र. PG/1/1519 OF 2002 दि.१० जून, २००२ अन्वये संलग्नीत महाविद्यालयातील व विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विविध अभ्यासक्रमांसाठी विविध प्रकारचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभागाने शिष्यवृत्ती संबंधी निर्गमित केलेला शासन निर्णय क्रमांक इबीसी २००३/ प्र.क्र. ३०१/मावक-२ दि. ०१ नोव्हेंबर,२००३ विद्यापीठाने परिपत्रक क्र. वि.क./भा.स.शि./(२४)/१९/२००४ दि. २१ जानेवारी, २००४ अन्वये सर्व संबंधीतांना अंमलबजावणीसाठी निर्गमित केला आहे. सदर योजनेत अनुसूचित जाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/इतर मागास वर्ग/विशेष मागास प्रवर्ग येतात.

संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांनी देखील परिपत्रक क्र. स.क.सं/शिक्षण/शि.सं./भा.स.शि./शिफी/पफी/०४-०५/का-१००५/दि. २४ जून, २००४ अन्वये याबाबत स्पष्ट सुचना दिल्या आहेत. (संलग्न)

सदर शासन निर्णयातील ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१. प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणा-या माहिती पुस्तकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आवेदन पत्र जोडण्यात यावे.
२. नवीन विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत शिक्षण संस्थेची राहील.
३. प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना P.I.A. खाते उघडणे आवश्यक आहे.
४. शिष्यवृत्ती वाटप करण्याची , हिशोब ठेवण्याची व इतर प्रशासकीय जबाबदारी अनुदानित शासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर असेल.
५. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांवर असेल. यात विलंब व गैरप्रकार झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी प्राचार्यांवर असेल. यात दंडनिय कार्यवाहीची देखील तरतुद आहे.
६. शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार शासकिय व अनुदानित संलग्न महाविद्यालयाच्या प्राचार्यांना प्रदान करण्यात आले आहेत. ९०% तदर्थ अनुदान ३१ जूलै पूर्वी समाज कल्याण विभागाकडून प्राप्त होईल. तशी प्रत्येक जिल्हा समाज कल्याण अधिका-यांची जबाबदारी आहे.

७. विना अनुदानित संलग्न महाविद्यालयातील अभ्यासक्रमातील व परराज्यात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व फीशीप मंजुर करण्याचे अधिकार पुर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना आहेत.

८. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी वसुल करू नये व कोणत्याही प्रकारचे अनामत शुल्क घेऊ नये तसे आढळल्यास संबंधीत महाविद्यालयाच्या विरूद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येई ल.

९. ही योजना राबविण्यासाठी महाविद्यालयांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी रू. ५/- सेवा शुल्क समाज कल्याण विभागाकडून मिळेल.

सदर शिष्यवृत्तीं योजना भारत सरकारच्या कल्याण मंत्रालयाव्दारे निर्गमीत केलेल्या नियमावलीनुसार राबविण्यात येते. (नियमावली संलग्न). सदर नियमावलीतील परिच्छेद V (iii) खालील प्रमाणे आहे.

(iii) Fees :- Scholars will be paid enrolment/registration, tuition, games, Union, Library, Magazine, Medical Examination and such other fees compulsorily payable by the scholar to the institution or University/Board. Refundable deposit like caution money, security deposit will be however be excluded.

अनुसूचित जमातींकरिता शिष्यवृत्ती व फीशीप योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असुन त्याबावत आदिवासी विकास, नाशिक यांच्या परिपत्रक क्र. भा.स.शि.-२००१ प्र.क्र.२/का.९(२) दि. १७ ऑगस्ट, २००१ व भारत सरकार, आदिवासी मंत्रालय पत्र क्र. २००१४/१०/२००-TDA (Vol.III) दि. १९ फेब्रुवारी,२००४ मध्ये सविस्तर योजना दिलेली आहे. (संलग्न)

या विषयावर दि. ३० जुन, २००४ रोजी मान. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्राचार्यांच्या बैठकीत विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर व ठाणे आणि प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग)यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम व(Deposit) कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारू नये असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे दि. ६ जुलै २००४ रोजी सोमय्या इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, विद्याविहार आणि दि. ९ जुलै, २००४ रोजी रूईया महाविद्यालय, माटुंगा येथे झालेल्या प्राचार्यांच्या बैठकीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम व कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये अशा स्पष्ट सुचना समाज कल्याण विभाग मुंबई उपनगर मार्फत देण्यात आल्या आहेत. पत्र क्रमांक विजिसकअ/मुउप/मासशि/०४-०५/४२९ दि. ०१ जुलै, ०४ अन्वये विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची अनामत रक्कम घेतली जाऊ नये असे कळविले आहे. (लायब्ररी डिपॉझीट, प्रयोगशाळा डिपॉझीट, कॉशन मनी)

या परिपत्रकानुसार सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाने CONCOL/FEE/190 OF 2003 दि.१३/०५/२००३ परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या शुल्कापैकी मागासवर्गीयांकडून क्र. ८,९,१०,११ करिता दर्शविलेले शुल्क रू. १२०/- महाविद्यालयीन स्तरावर आकारण्यात यावे. विद्यापीठ विभागामधील प्रवेशासाठी परिपत्रक क्र. PG/1/454 of 1996 दि. १८ ऑक्टोबर,१९९६ मधील रू. ७५/- शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावे. ईतर अभ्यासक्रमांसाठी जे - जे शुल्क शासनाच्या समाजकल्याण विभागाकडुन मंजुर होणार आहे ते - ते शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन आकारू नये.

शिष्यवृत्ती व फ्रीशीपकरिता पात्र असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून यावर्षी घेण्यात आलेले शुल्क त्वरीत परत करण्यात यावे व त्यांच्याकडून शिष्यवृत्ती/फ्रीशीपचे अर्ज भरून संबंधीत विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी / प्रकल्प अधिकारी (आदिवासी कल्याण विभाग) यांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्काचा तपशील देऊन सादर करावेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची/ फ्रीशीपची ६० ते ९० टक्के रक्कम ऑगस्टपुर्वी प्राप्त होणार असल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज व पदव्युत्तर नोंदणी अर्ज शुल्कासह विहित मुदतीत विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत व संबंधीत विद्यार्थ्यांना त्याबाबतच्या पावत्या देण्यात याव्यात. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फ्रीशीप/ शिष्यवृत्ती समाज कल्याण/आदिवासी विकास विभागाने नामंजुर केली असेल अशा विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य ती फी आकारण्यात यावी.

बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS), बॅचलर ऑफ मास मिडीया(BMM), बॅचलर ऑफ सायन्स (आयटी) (B.Sc-IT), बॅचलर ऑफ सायन्स (बायोटेक्नॉलॉजी),B.Sc(Computer), बी.कॉम (बॅकींग ॲन्ड इन्शुरन्स),B.Com(Finanace & Accounts), B.Sc( Bio-chemistry), मास्टर ऑफ कम्युनिकेशन ॲड जर्नालिझम, मास्टर ऑफ थिएटर आर्ट, B.Sc.(Civil Aviation) लोककला ईत्यादी. विना अनुदानित अभ्यासक्रमांसाठी देखील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती नियमावली पहिला परिच्छेद V (iii) मध्ये दिलेली फी समाज कल्याण विभागामार्फत/आदिवासी विकास विभागामार्फत प्रदान करणार असल्याने त्यांच्याकडून वरिल परिच्छेद V(iii) मधे दिलेली फी आकारू नये. तसेच कोणत्याही प्रकारची अनामत रक्कम घेऊ नये, परंतु त्यांच्याकडुन प्रवेशाच्यावेळी योग्य प्राधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र घेण्यात यावे व त्वरीत शिष्यवृत्ती/ फ्रीशीपचे अर्ज भरून संबंधीत समाज कल्याण अधिकारी / प्रकल्प अधिकारी (आदिवासी विकास विभाग) यांच्याकडे पाठवावेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर होतील त्याच्याकडून पुर्ण फी घेण्यात यावी. तसेच जे विद्यार्थी शिष्यवृत्ती/ फ्रीशीपचे अर्ज भरणार नाहीत त्यांच्याकडुन विद्यापीठाच्या नियमानुसार पुर्ण फी घेण्यात यावी.

भज (क) भज (ड) व इमाव करिता क्रीमीलेअरचे तत्व लागु असल्याने या योजनेचा लाभ घेताना नॉन क्रीमीलेअरचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने महाविद्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात यावी व याप्रकरणी कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी/प्रकल्प अधिकारी अथवा उपकुलसचिव (विशेष कक्ष), मुंबई विद्यापीठ यांचेशी संपर्क साधावा.

<u>दूरध्वनी क्रमांक ः</u>

१. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई. २५२७५०७३, उपनगर २५२२२०२३.
२. प्रकल्प अधिकारी, मुंबई. २८७५४०२३.
३. उपकुलसचिव (विशेष कक्ष), मुंबई विद्यापीठ. २२६३३०९५.

दिनांक ः २५ ऑगस्ट, २००४
ठिकाण ः मुंबई

कुलसचिवांकरिता

प्रत १- प्राचार्य/संचालक कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था. (अल्पसंख्यांक आणि विगर अल्पसंख्यांक महाविद्यालये)

२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव यांना माहितीसाठी.

३. संचालक/विभाग प्रमुख विद्यापीठ विभाग आणि प्राचार्य सर.ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय.

४. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ, फोर्ट, मुंबई.

५. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना, विद्यानगरी सांताक्रुझ (पु), मुंबई.

६. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन,वी रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

७. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, अ - १/२४, अनुपम नगर, मुरबाड रोड, कल्याण, जिल्हा- ठाणे.

८. सचिव, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक स्टाफ असोसिएशन. विद्यानगरी सांताक्रुझ (पु), मुंबई.

कुलसचिवांकरिता

University of Mumbai

मुंबई विद्यापीठ

# CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION (CDOE)
# [FORMERLY INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING (IDOL)]

## दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)
## [पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल)]

**https://mahadbt.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती योजना मंजूरी आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती योजना दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमास मंजूरी नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

| Social Justice and Special Assistance Department<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | Tribal Development Department<br>आदिवासी विकास विभाग | VJNT, OBC and SBC Welfare Department<br>विमुक्तजाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय |
|---|---|---|
| Schedule Caste<br>अनुसूचित जाती | Scheduled Tribes<br>अनुसूचित जमाती | Vimukta Jati, Nomadic Tribes /Other Backward Class / Special Backward Classes<br>विमुक्त जाती, भटक्या जमाती / इतर मागासवर्ग / विशेष मागास प्रवर्ग |
| Govt. of India Post-Matric Scholarship<br>भारत सरकार पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना | Post-Matric Scholarship Scheme (Govt. of India)<br>भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | Post Matric Scholarship to OBC/VJNT/SBC<br>इमाव / विजाभज / वि.मा. प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती |
| आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे :- | आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे :- | आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे :- |
| उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार द्वारे प्रदान)<br>(वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे). | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र<br>(कौटुंबिक उत्पन्न <= २.५०.०००) | उत्पन्न प्रमाणपत्र / मिळकत घोषणापत्र. सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे.<br>(वार्षिक उत्पन्न रु. १.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे). |
| जात प्रमाणपत्र (विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौद्ध असावा). | जात प्रमाणपत्र (अनुसूचित जमाती).<br><br>व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जाति वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. (Caste Validity Certificate) | जात प्रमाणपत्र - सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे. (महाराष्ट्र शासनाद्वारे जारी केलेले). वास्तव्याचा पुरावा म्हणून हे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.<br><br>जात पडताळणी प्रमाणपत्र - व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम, व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अनिवार्य. बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य नाही. (Caste Validity Certificate) |
| डोमिसाईल प्रमाणपत्र (विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा). | डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा). | डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा). |
| १०वी/१२वी परीक्षेची गुणपत्रिका<br>गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका. | १०वी/१२वी परीक्षेची गुणपत्रिका<br>मागील वर्षाचे गुणपत्रिका. | १०वी/१२वी परीक्षेची गुणपत्रिका<br>गत वर्षीच्या परीक्षेची गुणपत्रिका. |
| शिक्षणातील खंड बाबतचे आणि स्व:घोषणापत्र (आवश्यक असल्यास). (Gap Cert.) & (Self Declaration If Required) | नोकरी करत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (Affidavit)<br>[शंभर रुपयाच्या (रु. १००/-) स्टॅंप पेपरवर]. | अंतर प्रमाणपत्र - शिक्षणामध्ये खंड असल्यास हे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. (Gap Cert.) |
| वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास). | | शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र. (Leaving Cert.) |
| पतिचे उत्पन्न प्रमाणपत्र (अर्जदार जर विवाहीत स्त्री असल्यास)<br>(वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे). | | शिधापत्रिका (Ration Card) - कुटुंबातील मुलांची एकूण संख्या ओळखण्यासाठी (केवळ दोन अपत्य.)<br>i) मुलींसाठी हि अट बंधनकारक नाही.<br>ii) एकाच पालकाची जास्तीत जास्त २ मुले शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील. |
| | | एकूण लाभार्थी मुलांच्या संख्येबाबत आई-वडिलांचे / पालकांचे घोषणापत्र. (Declaration Cert.) |
| | | वडिलांचे / पालकांचे मृत्यू प्रमाणपत्र (लागू असल्यास). |
| आधार संलग्नीकृत बँक खाते असावे. | आधार संलग्नीकृत बँक खाते असावे. | आधार संलग्नीकृत बँक खाते असावे. |

शिष्यवृत्ती बाबत सविस्तर माहितीसाठी mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळ पहावे.

शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यापूर्वी "अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेचे नियम आणि मार्गदर्शक तत्वे" https://mahadbt.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर कृपया काळजीपूर्वक वाचा.

महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना current course details मध्ये fees paid म्हणून 00 (शून्य शून्य) रक्कम नमूद करावी.

महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना College Name येथे Centre for Distance and Online Education असे नाव लिहावे.

महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यानंतर सात दिवसाच्या आत शिष्यवृत्ती अर्जाच्या छायाप्रतीसह दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी.डी.ओ.इ.) चा प्रवेश अर्ज, शुल्क पावती व "हमीपत्र" भरुन कक्ष क्रमांक १०८-अ, शिष्यवृत्ती विभाग, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात जमा करावेत.

निर्धारित वेळेत ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यात अयशस्वी झालात किंवा एखाद्या कारणास्तव शासनाकडून शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात आली तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी आकारण्यात येणारे संपूर्ण शैक्षणिक शुल्क (उर्वरित रक्कमेचा फरक वगळून) दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रात भरावे लागेल.

CDOE मधील ज्या अभ्यासक्रमांचा समावेश महाडिबीटी संकेतस्थळावर नसेल, अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या "राखीव प्रवर्ग" विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरावे लागेल.